सुविचार

प्रत्येक दिवसाला एक नवीन संधी म्हणून जगा.

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com




पवनचक्की उद्योगामुळे वाशी तालुक्यातील अर्थकारणाला गती

पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 152 ■ रविवार,दि. 13 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# साठमारीच्या राजकारणाचे 100 दिवस!

## जिल्हा नियोजन समितीच्या निधीला ब्रेक कायम,विकास ठप्प

सज्जन यादव | आरंभ मराठी

धाराशिव – आकांक्षीत जिल्हा म्हणून धाराशिव जिल्ह्याची ओळख. पण ही ओळख पुसण्याऐवजी नियमित असलेल्या निधीला ब्रेक लावून राजकीय साठमारीचा करेक्ट कार्यक्रम सुरू आहे. तब्बल १०० दिवसांपूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगिती देण्यात आली असून, त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाचा गाडा रुतला आहे. यासंदर्भात आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत आवाज उठवला. मात्र, सरकार बधले नाही. त्यामुळे एकीकडे विकासकामांपासून कमालीच्या दूर असलेल्या जिल्ह्याच्या विकासाला मागासलेपणात ढकलणाऱ्या नेत्यांनी आता चिंतन करण्याची गरज निर्माण झाली आहे. जिल्हा नियोजन समितीच्या प्रशासकीय मान्यता मिळालेल्या परंतु, कार्यारंभ आदेश न दिलेल्या सर्वच कामांना स्थगिती देण्याबाबतचे आदेश १ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी काढले होते. पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी २४ मार्च रोजी दिलेल्या पत्रानुसार जिल्हाधिकारी यांनी हे आदेश काढले होते. या आदेशानंतर सर्वपक्षीय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला. सुरुवातीच्या काळात यावरून आरोप–प्रत्यारोप झाले. डीपीसीच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तर जुंपलीच. शिवाय महायुतीतील दोन पक्षात देखील




जुंपल्याचे पाहायला मिळाले. १ मे रोजीच्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत देखील याच विषयावरून खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले. मात्र इतकं सगळं होऊनही साडेतीन महिने झाले तरीही हा विषय अजूनही तसाच आहे. डीपीसीच्या २६८ कोटींच्या कामांना शासनानेच स्थगिती देण्याचा प्रकार राज्यात फक्त धाराशिव या एकाच जिल्ह्यात घडला आहे.विशेष म्हणजे पालकमंत्र्यांनीच यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले आहे. साडेतीन महिने झाले तरी स्थगितीचे नेमके कारण अजूनही समोर आलेले नाही. अशा या राजकीय कुरघोड्यांमुळे जिल्ह्याच्या विकासाला ग्रहण लागल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्हा नियोजन समितीला गेल्यावर्षी ३५८ कोटींचा निधी मिळाला होता. त्यामध्ये आकांक्षीत जिल्हा म्हणून आणखी ५० कोटींची भर पडली. असा एकूण ४०८ कोटींचा विकासनिधी जिल्ह्याला मिळाला होता. परंतु, लोकसभा निवडणुकीमुळे मागील वर्षी मार्च, एप्रिल, मे आणि जून असे चार महिने कुठलेही काम करता आले नाही. तर विधानसभा निवडणुकीमुळे ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असे दोन महिने वाया गेले. म्हणजे मागील वर्षी सहा महिने आचारसंहितेत वाया गेले. जानेवारी महिन्यात धाराशिवचे पालकमंत्री म्हणून प्रताप सरनाईक यांची निवड झाली. त्यांची निवड होईपर्यंत १४० कोटींची कामे करण्यात आली होती. राहिलेला २६८ कोटींचा निधी ३१ जुलै २०२५ पर्यंत खर्च करणे आवश्यक असताना त्यावर स्थगिती आणली. यामध्ये जिल्हाधिकारी यांना २४ मार्च रोजी पालकमंत्री सरनाईक यांनी पत्र लिहून स्थगिती देण्यास सांगितले होते. यातील काही कामामध्ये अनियमितता असल्याचा आरोप आमदार राणा पाटील यांनी केला होता. त्यांनीच मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून ही स्थगिती आणल्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले होते. सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात देखील आमदार कैलास पाटील यांनी या स्थगितीवर सभागृहात बोलताना टीका केली. पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी मागील दौऱ्यात स्थगिती लवकरच उठेल असे सांगितले होते. परंतु त्यादृष्टीने काहीच हालचाल होत नसल्याचे सध्या दिसून येत आह

### स्थगितीमुळे कामे ठप्प

स्थगिती देण्यात आलेल्या कामामध्ये आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा ही कामे ठप्प झाली आहेत. २६८ कोटी रुपयांच्या निधीतून अनेक विभागाची महत्त्वाची कामे होणार आहेत. यामध्ये ८२ शालेयवर्ग खोल्यांचे बांधकाम, जवळपास २५० रस्त्यांची कामे, सव्वाशे शेतातील डीपी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील काही उपकरणे, आयुर्वेद महाविद्यालयातील उपकरणे तसेच औषध व इतर साहित्य खरेदी, पशुधनाच्या संवर्धनासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजना, नगरपालिका अंतर्गत येणारे रस्ते, पथदिवे, इमारतीच्या दुरुस्तीची कामे ही सर्व कामे स्थगिती दिल्यामुळे मागील साडेतीन महिन्यांपासून ठप्प झाली आहेत.

### नियोजन कार्यालयाला वाली नाही

एकीकडे जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगिती मिळाळी असताना दुसरीकडे जिल्हा नियोजन कार्यालयात देखील शुकशुकाट पहायला मिळत आहे. जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे यांची काही दिवसांपूर्वी नांदेड येथे बदली झाली आहे. त्यांचा कारभार सहायक नियोजन अधिकारी असलेले श्रीकांत कुंठला हे पाहत होते. मागील आठवड्यात त्यांचीही सोलापूरला बदली झाल्यामुळे नियोजन कार्यालयाला सध्या वालीच नाही. जिल्ह्यातील अंतर्गत राजकारणामुळे धाराशिव जिल्ह्यात नियुक्ती घेण्यासाठी अधिकारी घाबरत आहेत, अशी चर्चा प्रशासकीय वर्तुळात होत आहे. राजकीय कुरघोड्यामुळे जिल्हा बदनाम होत असताना आता अधिकारी देखील जिल्ह्यात नियुक्ती घेण्याची हिंमत करतना.

## उमरगा आगाराला मिळाल्या नवीन ५ बस; प्रवाशांना मोठा दिलासा

### शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्या पाठपुराव्याला यश; पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे मानले आभार

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा आगारासाठी नवीन ५ बस उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांच्या सोयीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, यामुळे प्रवास अधिक सुलभ व आरामदायी होणार आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार आणि त्यांच्या सोयीसाठी उमरगा आगारात नवीन बसेस देण्यात याव्यात, अशी सातत्याने मागणी शिवसेना उपनेते तथा उमरगा–लोहारा तालुक्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी परिवहन मंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री प्रताप



सरनाईक यांच्याकडे केली होती. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून, प्रत्यक्षात आता उमरगा आगारासाठी ५ नवीन बसेस दाखल झाल्या आहेत. या निर्णयाबद्दल ज्ञानराज चौगुले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, तसेच परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. उमरगा आगाराला नवीन बसेस मिळाल्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय दूर होणार आहे. वाढत्या प्रवासी संख्येला योग्य





प्रतिसाददेण्यासाठी आणि प्रवासात होणारा वेळ व असुविधा कमी करण्यासाठी हा निर्णय फार मोठा ठरणार आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, महिला व सर्वसामान्य नागरिक यांना सुरक्षित व वेळेवर वाहतूक सुविधा मिळण्यास मदत होणार असून, उमरगा आगाराच्या कामकाजाला नवी गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## कसबे तडवळे येथील३७ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

### कन्या शाळेतील जान्हवी जाधव राज्य गुणवत्ता यादीत

आरंभ मराठी | कसबे तडवळ

इयत्ता पाचवी व आठवी साठी ९ फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल १० जुलै २५ रोजी जाहीर झाला.यामध्ये जयहिंद विद्यालय कसबे तडवळे इयत्ता आठवीचे ६ विध्यार्थी जिल्हा परिषद आदर्श कन्या शाळेतील २२ मुली,जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळेतील ९ विध्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत यामध्ये कन्या शाळेतील जान्हवी संतोष जाधव २७८ गुण घेऊन राज्य गुणवत्ता यादीत आली आहे.

तडवळे गावचे एकूण ३७ विद्यार्थी त्यामध्ये जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवी वर्गातील तब्बल २२ विद्यार्थीनी शिष्यवृत्तीधारक झाल्या आहे.यामध्ये जान्हवी संतोष जाधव २७८,तेजस्विनी किरण राऊत २६८,सोनाली विनोद जाधव २६०,गौरवीरामराजे शिनगारे २५८,सई पवन वैद्य २५८, आराध्या उमाकांत जमाले २५४,मृत्युंजया महेश लांडगे २५२,अमृता अमोल रोहिले २५०,श्रावणी दयानंद राऊत २४८,स्वराली भागवत शेळके २४६,आश्लेषा किरण शिंदे २४२,आरुषी अमोल सरवळे २४२,अर्णवी जयसिंग थोरात २४६,कार्तिकी




शिवानंद पुजारी २३४,श्रेया किशोर कावळे २३२,संस्कृती पांडुरंग घोगरे २३२,ईश्वरी नागनाथ डुमणे २२६,अक्षरा धनंजय लोमटे २२४,वैष्णवी विजय निंबाळकर २२४,मानसी शिवाजी करंजकर २२२,तहसीन सरफराज शेख २२०,सृष्टी महादेव गरड २२० या विद्यार्थीनीगुण घेतले आहेत. आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळा कसबे तडवळे येथील तन्मय दत्तात्रय नेमाने २५० गुण,अमेय दिलीप घोंगडे २४४ गुण,सोहम ज्ञानेश्वर करंजकर २३८ गुण,समर्थ सुखदेव घुले २३८ गुण,सोहम नामदेव जमाले २३६ गुण,अथर्व सुहास गरड २३४ गुण,अतिफ मजहर शेख २२६ गुण,प्रणित सुरज महाडिक २२२ गुण,सार्थक बालाजी वाकळे २१६ गुण हे विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत.कसबे तडवळे येथील जयहिंद विद्यालयातील ६ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. यामध्ये ऋतुजा ज्ञानेश्वर बारवकर १९४ गुण, समर्थ सोमनाथ शिंदे १९२गुण ,अक्षरा लहू शिंदे १९०गुण ,सायली मच्छिंद्र डोलारे १७६ गुण,सोनाली दत्ता पैकेकर १७६ ,वैष्णवी विशाल गायकवाड १५२ गुण घेऊन शिष्यवृत्तीधारक झाले आहेत.

## बेशिस्त भाजी विक्रेत्यांमुळे रस्त्यावरच मंडई


### मंडईसाठी स्वतंत्र जागा असूनही रस्त्यावरच ठिय्या


### देशपांडे स्टँडवरील भाजी मंडईत बेशिस्त विक्रेत्यांमुळे समस्या

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरात देशपांडे स्टॅण्ड परिसरात भाजी विक्रेत्यांसाठी पालिकेच्या वतीने अधिकृत भाजीमंडईसाठी जागा निश्चित करून देण्यात आलेली आहे. मात्र, तरीही बहुतांश भाजीविक्रेते आपली हात गाडी रस्त्यात जेथे जागा मिळेल तेथे गाडी लावून व्यवसाय करत आहेत. भाजीविक्रेते व्यापारी आणि शेतकरी रस्त्यातच आपली हातगाडी लावत असल्याने तसेच विक्रीसाठी रस्त्यावरच ठिय्या मांडत असल्याने या भागात वाहतुकीचा खोळंबा होत आहे. अनधिकृतपणे रस्त्यात ठाण मांडून बसणाऱ्या भाजी विक्रेत्यांवर कारवाई करून रस्ता वाहतुकीस मोकळा करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांतून होत आहे. देशपांडे स्टॅण्ड पासून ते नेहरू चौकापर्यंतचा रस्ता अगोदरच अरुंद आहे. त्यातच या रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे या रस्त्यावरून वाहन चालवणे मोठे कठीण बनले आहे. त्यातच देशपांडे स्टँडकडून नेहरू चौकाकडे जाताना शंभर मीटरचा तीव्र उतार आहे. याच उतारावर दोन्ही बाजूंनी भाजी विक्रेत्यांनी रस्त्याला विळखा घातला आहे. रोडला दोन्ही बाजूंना भाजी, फळविक्रेत्यांनी हातगाड्या लावल्या आहेत. त्यामुळे परिसरातून प्रवास करताना वाहनचालकांच्या नाकीनऊ येत आहे. दररोज परिसरातील शेकडो नागरिक या मार्केटमध्ये भाजीपाला खरेदीसाठी गर्दी करतात. मात्र, मंडई परिसरात स्वच्छतेचा अभाव आणि वाहतुकीची अडचण यामुळे







स्थानिकांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. दिवसेंदिवस ग्राहकांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे भाजी विक्रेत्यांची संख्यासुद्धा वाढली आहे. रस्त्यावरील वाहतूक संथ होऊन वाहतूककोंडी नित्याची झाली आहे. याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागतो. पालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत कारवाईच होत नसल्यामुळे या भागात गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नगर पालिकेने भाजी विक्रेत्यांसाठी मंडईची जागा निश्चित केली परंतु, त्याठिकाणी कसल्याच सोयी सुविधा उपलब्ध नाहीत. पालिकेकडून १०, १५ आणि २० रुपयांच्या पटीत भाडेपट्टा मात्र वसूल केला जातो. याच भागात दोन ते तीन वाहतूक पोलीस तैनात असतात. मात्र ऐन रस्त्यावर बसलेल्या भाजी विक्रेत्यांना वाहतूक पोलीस हटकत देखील नाहीत. सध्या हा भाग अपघातप्रवन क्षेत्र बनला आहे. रविवारी आणि गुरुवारी परिस्थिती अजूनच गंभीर असते. नगर पालिकेने आणि वाहतूक पोलिसांनी भाजी विक्रेत्यांना शिस्त लावून हा रस्ता मोकळा करावा अन्यथा या रस्त्यावर गंभीर दुर्घटना घडू शकते अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## मेडिकल कॉलेजमुळे उपचारासाठी सोलापूरला जाणाऱ्या रुग्णांचे प्रमाण निम्म्याने घटले

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात मेडिकल कॉलेजमुळे रुग्णांना वेळेत योग्य उपचार मिळत असल्यामुळे जिल्ह्यातील रुग्णसेवेचा दर्जा सुधारला आहे. त्यामुळे सोलापूरला उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांचे प्रमाण निम्म्याहून कमी झाले असून, आरोग्य क्षेत्रात देखील धाराशिवची वाटचाल योग्य प्रकारे सुरू असल्याचे मत मित्र संस्थेचे उपाध्यक्ष आमदार राणा पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामकाजासंबंधी आढावा घेतल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. तानाजी लाकाळ उपस्थित होते. पुढील महिन्यात मेडिकल कॉलेजमध्ये १५० पदांची नवीन कंत्राटी भरती करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. मेडिकल कॉलेजच्या स्टाफमध्ये बरेच डॉक्टर बाहेरील राज्यातील आहेत त्यामुळे त्यांचे मनोबल वाढवणे गरजेचे असून पत्रकारांनी आणि स्थानिकांनी त्यांचे मनोबल वाढवावे असे आवाहन यावेळी पाटील यांनी केले. नवीन सिव्हिल हॉस्पिटलच्या इमारतीचे भूमि पूजन झाले असून एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या माध्यमातून कर्ज घेऊन सिव्हिल हॉस्पिटलचे काम होणार असल्याचे आमदार पाटील म्हणाले. त्यासाठी ३२९ कोटींचा निधी मिळणार असून ५०० बेडचे सुसज्ज हॉस्पिटल होणार असल्याचे ते म्हणाले. मेडिकल कॉलेजमध्ये डेंटल, फार्मसी, फिजिओथेरपी हे वेगवेगळे कॉलेज सुरू करण्याचे प्रयत्न करणार असून धाराशिवमध्ये मेडिकल हब विकसित करणार असल्याचेही ते म्हणाले. आयटीआय चे स्थलांतर तंत्र प्रशाला, देशपांडे स्टॅण्ड येथे करण्यासाठी प्रयत्न केले जात असून, मेडिकल कॉलेजच्या माध्यमातून चांगल्या सोयी देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे आमदार राणा पाटील यावेळी म्हणाले.


## गरजू विद्यार्थ्यांना आज वह्यांचे वाटप

आरंभ मराठी | धाराशिव

येथील मराठा वधू–वर सूचक समितीच्या वतीने गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात येणार आहेत. हा कार्यक्रम रविवारी (दि. १३) सकाळी १० वाजता शहरातील स्वयंवर मंगल कार्यालयात (जिजाऊ चौक) घेण्यात येणार आहे. मराठा वधू–वर सूचक समितीच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वेगवेगळ्या शाळेतील गरजू तसेच होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत व्हावी, यासाठी समिती सदस्यांनी स्वखर्चाने वह्यांचे वाटप करण्याचा निर्णय घेतला.यासाठी शहरातील प्रत्येक शाळेतून गरीब, होतकरू विद्यार्थ्यांची नावे मागविण्यात आली होती. दरम्यान, रविवारी सकाळी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते वह्या वाटप कार्यक्रम होणार असून, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार कैलास पाटील असतील. मार्गदर्शक म्हणून प्राचार्य जयसिंगराव देशमुख, प्राचार्य अशोक घोलकर, प्रा.अभिमान हंगरगेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, चंद्रसेन देशमुख, विक्रम पाटील,बाजार समितीचे संचालक उमेश राजेनिंबाळकर, ॲड. दर्शन कोळगे, तानाजी जाधव,बिभीषण मोरे,प्रीतम बागल यांची उपस्थिती राहणार आहे.कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजन समितीचे अभिमान हंगरगेकर, अशोक गायकवाड,राजू तांबे, प्रा.नवनाथ पवार, ॲड.रमेश भोसले, अर्जुन जाधव, अशोक ठोंबळ, गोरोबा लोंढे,कमलाकर मुंडे, अण्णासाहेब कदम, दत्तात्रय घाडगे, विजयकुमारपवार,दशरथथोरात,अशोकचव्हाण,सतीशपवार,लखनमुंडे, अमोल निंबाळकर, अनिता पाटील,स्वाती देशमुख यांनी केल`आहे.

# लोकपरंपरांचा साक्षेपी धांडोळा: लोकरहाटी

**शहरी** संस्कृती अंगवळणी पडलेला समाज ग्रामीण म्हणजेच कृषी संस्कृतीकडे काहीशा कुत्सीत दृष्टीने पाहात आलाय,त्याला कारणीभूत त्याच्यावर नकळतपणे होत गेलेले चूकीचे संस्कार तसेच शिक्षण व साहित्यामधून बिंबवल्या गेलेल्या धारणा आहेत.कृषीप्रधान भारतात गावखेडी भकास करण्यालाच विकास मानले जात आहे.शहरे आणि महानगरांची वाढत चाललेली सूज हा आपल्यापुढचा आजचा एक अक्राळविक्राळ प्रश्न बनला आहे. अशा काळात पुढच्या पिढ्यांवर कृषीसंस्कृतीची महत्ता ठसविण्याकामी आपण किंवा आपली शिक्षणव्यवस्था काही ठोस उपाय करणार आहे की नाही? याची चर्चा करताना पत्रकार,लेखक आणि लोकसंस्कृतीचे अभ्यासक डॉ.मुकुंद कुळे यांनी लिहिलेल्या लोकरहाटी या अभ्यासपूर्ण पुस्तकाची उपयुक्तता स्पष्ट होते. या पुस्तकामधून कुळे यांनी कृषीसंस्कृतीमधील विविधप्रथा,परंपरांचासाक्षेपीधांडोळाघेतलाआहे. लोकसाहित्याच्या अभ्यासिका डॉ.तारा भवाळकरांची या पुस्तकाला प्रस्तावना लाभली आहे.एकूण सतरा स्फुट लेखांचा हा संग्रह आहे.भारतातील ग्रामजीवन हळू हळू लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.दहा वर्षांपूर्वी गावखेड्यात पाहिलेल्या,अनुभवलेल्या गोष्टी आता इतिहासजमा झाल्या आहेत.शहरी विकासाचा बुलडोझर गावाचे गावपण उद्ध्वस्त करीत निघाला आहे.या पुस्तकातून ते हरवत चाललेले,हवेहवेसे वाटणारे गावपण,ग्राम संस्कृती वाचकांना कडकडून भेटते.आधुनिक शेतीकडे शेतकऱ्यांचा वाढत चाललेला कल पशूपालनाऐवजी यांत्रिकीकरणावर भर देणारा आहे.त्यामुळे खेड्यापाड्यातले अर्थकारणदेखील बदलत चाललेय.या सर्व गोष्टींचा दृष्य,अदृष्य परिणाम ग्रामजीवनावर पडलेला जाणवतो. जुन्या सर्व रितीरिवाजांकडे सरसकटपणे अंधश्रद्धा म्हणून पाहाणेही चूकीचे ठरेल.विवेकी मनावर झालेले वैज्ञानिक शिक्षणाचे संस्कार लोकसंस्कृतीतील धारणा स्विकारायला नकार देतात,पण डॉ.कुळे यांनी या पुस्तकामधून कुठेही अंधश्रद्धांची पाठराखण न करता यामागच्या लोकरहाटीतील जुन्या कल्पनांची चर्चा केली आहे.त्यांचा मागोवा घेतला आहे. उच्चशिक्षित होणारी पिढी शेतीच्या कामातून बाहेर पडते आहे.त्याचा ग्रामीण संस्कृतीलाच फटका बसतो आहे.डॉ.भवाळकर यांनी प्रस्तावनेत स्पष्ट केल्याप्रमाणे 'समाजजीवनाच्या एका टप्प्यावरचे लोकजीवन तपशीलाने समजून




घेतले तर समाजशास्त्रीय व मानववंशशास्त्रीय अभ्यासासाठी ते खूप उपयुक्त ठरणार आहे' नेमकी हीच बाब कुळे यांनी आपल्या पुस्तकातून अधोरेखीत केली आहे.लोकपरंपरा या प्रत्येक व्यक्तीच्या, मग ती शहरातली असो अथवा ग्रामीण भागातली,जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत असतात.लोकजीवनातील असंख्य प्रथा,परंपरांचा अर्थ लोकपरंपरेचे अभ्यासक नव्याने उलगडून दाखवित असतात. लोकरहाटीतील लोकांच्या समृद्ध जगण्याचा आधार असलेल्या या परंपरा जतन करण्याचा प्रयत्न सर्वांनीच करायला हवा.लोकपरंपरेतील बहूतेक प्रथा या कृषीसंस्कृतीशी निगडीत आहेत.महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात थोड्याबहूत फरकाने या प्रथा बऱ्याचशा




सारख्याच आढळतात. ग्रामीण संस्कृतीवर स्त्रियांचा असलेला वरचष्मा हा प्राचीन काळापासूनचा आहे.कृषीसंस्कृतीत स्त्री ही नेहमीच सर्वच बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते. 'लोकरहाटीतलं मानवी जीवन आणि निसर्ग यांना वेगळं करताच येत नाही,एवढं ते एकमेकांवर निर्भर असतं' असे निरीक्षण नोंदविताना कुळे यांनी पुस्तकातील 'लोकरहाटीच्या नावानं चांगभलं' या पहिल्या लेखामधून 'लोकरहाटी म्हणजे अनागर जीवनशैली' हा अर्थ स्पष्ट करुन सांगितला आहे.दिवस उगवल्यापासून ते दिवस मावळेपर्यंत ग्रामीण जीवनाचे रहाटगाडगे हे लोकपरंपरेत गुंफलेले असते.गावखेड्यातल्या देवीदेवता,त्यांच्या नावाने साजरे होणारे सण,उत्सव,जत्रा,यात्रा यांमधून लोकरहाटीची प्रत्यक्ष अनुभूती मिळू शकते.शहरी लोकांना अनेकदा गावातल्या या प्रथा-परंपरा कालबाह्य वाटू शकतात,पण ग्रामीण जनतेची नाळ अशा परंपरांशी आपसूकपणे जोडली गेलेली असते. त्या त्यांच्या जगण्याचा आधार बनलेल्या असतात.'लोकरहाटीत लोकदेवतांच्या भरवशावरच लोकमानस तग धरुन असतं' ही बाब स्पष्ट करताना 'पहिलं नमन लोकदेवतेला' या लेखात मुकुंद कुळे लिहितात,..या लोकदेवता धर्माने मानलेल्या देवतांपेक्षा एकदम भिन्न असतात,हे वेगळेपण केवळ पूजाअर्चा किंवा कर्मकांडातच नव्हे तर इतर गोष्टीतूनही जाणवतं' याचाच अर्थ लोकरहाटीने प्राचीन वसा,वारसा अद्यापही झिरपत ठेवलेला आहे.मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग बनलेले विठोबा,खंडोबा,जोतीबा,भैरोबा हे लोकदेव आजही लोक परंपरेचा काळीजश्वास आहेत.

लोकसंस्कृतीतील लोकदेवता या धार्मिक कल्पनांचे अवडंबर नाहीत,तर जिवंत माणसांच्या खऱ्याखुऱ्या प्रतिकृतीच आहेत. आजच्या काळात अशा अनेक लोकदैवतांवर आणि त्यांच्या धार्मिक प्रथापरंपरांवर सनातनी वैदिक व्यवस्थेचं अतिक्रमण झालेलं असलं तरी त्यातूनही अस्सल लोकजीवनाची झलक डोकावून जातेच.लोकरहाटीत शिरताना आपणांस लोकदेवतांना डावलणे निव्वळ अशक्यच असते,ही बाब डॉ.कुळे इथे नोंदवतात.लोकरहाटीत लोकदैवतांच्या बरोबरीने भुताखेतांच्या भन्नाट कल्पनांचे जगही समृद्ध आहे.चांगल्याविरुद्ध वाईटाचा संघर्ष हा अटळ असतो.म्हणूनच लोकभावनेने अशा कैक अतार्किक बाबी पिढ्यानपिढ्या जपल्या आहेत,ज्यात शेवटी विजय हा दैवतांचाच म्हणजे चांगल्याचा होतो हे निश्चित. प्रागतिक विचाराच्या जगात वावरताना अशा अवैज्ञानिक गोष्टी,जुनाट प्रथा मोडीत काढल्या जाव्यात यात दुमत नसले तरी त्यामुळे समृद्ध लोकवाङ्मयही नष्ट होत असल्याचे दुःख इथे लेखकाने व्यक्त केले आहे.



भरत यादव
yadavbh515@gmail.com
9890140500

लोकरहाटीचा गाडा व्यवस्थित चालण्यासाठी निसर्गाचीही साथ हवी असते.त्यासाठी पाऊस हा घटक अत्यंत महत्त्वाचा.कारण संपूर्ण कृषीसंस्कृतीचे भरणपोषण हा पाऊसच करीत असतो.त्यामुळे पावसाची आळवणी हा लोकपरंपरेतला जिव्हाळ्याचा विधी असतो. प्राचीन काळापासून वरुण,पर्जन्य अशा देवतांची पूजा,आळवणी होत आली आहे.भरपूर पाऊस पडला तर शेतकऱ्यांच्या शेतातले पीक वाढणार असते,बळीराजाच्या समृद्धीचा मार्ग हा पावसावरच अवलंबून असतो.त्याच्यामुळेच पाण्याची ददात मिटणार असते.समस्त सजीवांचा जीवनदाता हा पाऊस असतो.त्याची आळवणी करणारी लोकसंस्कृतीत असंख्य गाणी आढळतील,ज्यामधून लोकभावना उत्तम पर्जन्यवृष्टीसाठी कशा आसुसलेल्या असतात याची प्रचिती येते.लोकरहाटीचा कृषिसंस्कृती हा अविभाज्य भाग आहे.भारतासारख्या देशातील ऐंशी टक्के जनता कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे. म्हणूनच कृषी आणि कृषीपूरक गोष्टींचा अंतर्भाव हा लोकरहाटीत होतो.शेतीतल्या बरकतीवरच इतर सर्व व्यवसायांचेही भवितव्य अवलंबून असते.दिवाळीसारख्या सणाच्यानिमित्ताने कृषीसंस्कृतीचाजागरच होत असतो.अनेक पारंपारिक बोलगाण्यांनी हीदीपावली संपन्न होत आली आहे.दिव्यांची आरास करुन दिवाळीउत्सवाचा आनंद द्विगुणीत केला जातो,तसेच ईडा पिडा टळो,बळीचं राज्य येवो,अशी प्रार्थना करीत बायाबापड्या प्राचीन सम्राट महाबळीच्या आदर्श राजवटीची,सुखी आणि समृद्ध जीवनाची कामना करीत असतात. लोकरहाटीत अजूनही तग धरुन असलेल्या प्रत्येक घटकांचे आगळेवेगळे महत्त्व आहे.घरकामासाठी उपयोगी ठरणाऱ्या लहानमोठ्या गोष्टींनाही लोकजीवनात मानाचे स्थान आहे,म्हणून तर त्यांच्यावर कष्टकरी आयाबायांनीअसंख्य ओव्यांची रचना केल्याचे दिसून येते.शहरी भागातसाजरे होणारे सण आणि उत्सव आता एक इव्हेंट बनून गेले आहेत,त्यातला सांस्कृतिक गोडवा नष्ट झाला आहे.म्हणून ग्रामीण संस्कृतीच अजूनही आपल्या समृद्ध लोक परंपरांचं जतन करताना दिसते.'जोवर भारतातली खेडी अस्तित्वात आहेत तोवर लोकरहाटीला मरण नाही,'असा आशावाद व्यक्त करणारे मुकुंद कुळे एका अर्थाने लोकसंस्कृतीची थोरवीच विशद करतात.

**पुस्तकाचे नाव: लोकरहाटी**
**लेखक: मुकुंद कुळे**
**प्रकाशक: मनोविकास प्रकाशन,पुणे**
**पृष्ठसंख्या: १४८मूल्य: १५० रुपये.**

# सन्मान द्या, सन्मान घ्या!

**इंग्रजीतील** प्रसिद्ध म्हण आपण नेहमी ऐकत असतो, पण प्रत्यक्ष व्यवहारात मात्र तिच्या विरुद्ध वागतो. दुसऱ्याकडून सन्मान मिळावा यासाठी आपण हपापलेले असतो; परंतु दुसऱ्याला सन्मान देण्यात मात्र आपण भलताच कंजूषपणा दाखवतो. सन्मान देताना आपण त्यामागे आपला स्वार्थ पाहतो. एखाद्या प्रशासकीय अधिकाऱ्याकडून किंवा लोकप्रतिनिधीकडून आपली अडलेली कामे होतात म्हणून आपण त्यांचा सन्मान करतो, पण तो सन्मान निरपेक्ष नसतो. त्यांच्यासाठी हार-तुरे घेऊन जातो. अनेक वेळा तर जेसीबीच्या साहाय्याने मोठमोठाले हार आमदार, खासदार अथवा मंत्र्यांच्या स्वागतासाठी आणले जातात.परंतु हा सन्मान खरोखरच मनापासून केलेला असतो का? स्वतःला हा प्रश्न विचारला तर उत्तर 'नाही' असेच येते. निरपेक्ष भावनेने सन्मान योग्य व्यक्तीचा केला पाहिजे.आजच्या समाजात उपद्रवी मूल्य असणाऱ्या व्यक्तींना उपकारी मूल्य असणाऱ्यांपेक्षा अधिक सन्मान मिळतो. गावगुंड, अवैध व्यवसाय करणारे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे किंवा शिक्षा भोगून आलेल्यांनाही लोक भीतीपोटी सन्मान देतात. पण असा सन्मान हा खरा सन्मान नसून लाचारपणा आणि लाळघोटेपणा असतो. समाजासाठी काम करणारे सेवाभावी व्यक्ती, अध्यात्मिक प्रबोधनकार हे लोक सन्मानाच्या अपेक्षेशिवाय काम करतात, परंतु समाजाने त्यांचा कृतज्ञतेने सन्मान केला पाहिजे. दिवसभरात आपण अनेक व्यक्तींना भेटतो. त्यांच्या बरोबर बोलतो. पण आपण प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान देतो का? नाही. उदाहरणार्थ, हॉटेलमध्ये चहा देणाऱ्या वेटरला आपण अरे-तुरे करून बोलतो. त्याच्या सेवेमध्ये चूक झाली तर त्याला ओरडतो. ''सॉरी'', ''प्लीज'', ''थँक्यू'', ''यू आर वेलकम'' हे शब्द आपण क्वचितच वापरतो.याउलट प्रगत राष्ट्रांमध्ये या शब्दांचा वापर अत्यंत सामान्य आहे. दुसऱ्याचा आदर करण्यामध्येच त्यांच्या प्रगतीचे गमक दडलेले आहे. थोडीशी भौतिक प्रगती झाल्यावर अनेकजण स्वतःला 'सर्वश्रेष्ठ' समजतात. दुसऱ्यांना किरकोळ समजतात. प्रत्येक व्यक्तीला स्वतःची प्रतिष्ठा असते आणि आपण ती जपली पाहिजे, हे ते विसरतात. डोळ्यावर चढलेली पैशाची, स्वकर्तृत्वाची, आणि खोट्या स्वाभिमानाची धुंदी त्यांना आंधळं करते. अशा व्यक्ती कोणाचाच सन्मान करत नाहीत कधी कधी स्वतःच्या आई-वडिलांचाही नाही.दुसऱ्याचा सन्मान राखणे हे संस्कारांचे लक्षण आहे. ज्यांच्याकडे हे संस्कार नसतात, ते सर्व काही मिळवतात, परंतु समाजात खरी प्रतिष्ठा गमावतात. लोक त्यांच्यासमोर त्याला देखील खोटा सन्मान देतात, पण योग्य वेळ आल्यावर त्यांची खोड मोडल्याशिवाय राहत नाहीत. खरं तर दुसऱ्याचा सन्मान करणे अवघड नाही. यात कोणताही पैसा लागत नाही. साध्या बोलण्यातून व कृतीतून तो देता येतो. दुकानदाराकडून वस्तू घेतल्यानंतर 'थँक्यू' म्हणणं गरजेचं आहे. आपण असं समजतो की त्याला त्याच्या सेवेचा मोबदला दिला आहे, म्हणून आभार का मानावे? पण हे आभार त्याच्या प्रयत्नांचा, अस्तित्वाचा आणि जीवनसंघर्षाचा सन्मान असतो. अशा प्रकारे जर आपण परस्परांचा सन्मान करू लागलो, तर समाजात सकारात्मकता वाढेल. जगातील सर्वात आनंदी देशांमध्ये भारताचा क्रमांक १३७ देशांपैकी १२५ वा आहे. एवढ्या मोठ्या देशातील लोक इतके दुःखी का? यामागे एक कारण म्हणजे - समाजातून न मिळणारा सन्मान, हे सुद्धा आहे. लोक एकमेकांकडे द्वेषभावनेने बघतात. 'तू माझ्याकडे का पाहिलंस?' अशा कारणांवरून हाणामाऱ्या होतात. दुसऱ्याला सन्मान देण्याचे औदार्य वाढवले पाहिजे. आपण वर्षभरात अनेक दिनविशेष साजरे करतो परिचारिका दिन, शिक्षक दिन, अभियंता दिन, डॉक्टर दिन, मातृदिन, पितृदिन, रक्षाबंधन इत्यादी. या विशेष दिनांचे खरे उद्दिष्ट म्हणजे त्या व्यक्तींचा सन्मान करणे. जो दुसऱ्याला सन्मान देतो, त्याला दुपटीने सन्मान मिळतो. असे अनुभव आपल्याला अनेकदा येतात. दुसऱ्याचा सन्मान करणाऱ्याची समाजात चांगली प्रतिमा तयार होते. त्याचं कौतुक केलं जातं. 'सन्मान द्या आणि सन्मान घ्या' हे सूत्र जर समाजाने स्वीकारले, तर खऱ्या अर्थाने शांतता आणि सुव्यवस्था निर्माण होईल. हेच संस्कार पालकांनी आपल्या मुलांवर बिंबवले पाहिजेत.



किशोर जाधव,
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

# लाभले आयुष्य जितके ते जगावे चांगले

**आमच्या** जिल्हा परिषद प्रशाला खंडाळी या शाळेत दररोज परिपाठ घेतला जातो. या परिपाठात शाळेचे विद्यार्थी मन प्रसन्न करून टाकणाऱ्या वेगवेगळ्या प्रार्थना गातात. एके दिवशी रोजच्या प्रमाणे परिपाठ चालू असताना तिसरी वर्गातील विद्यार्थ्यांनी 'हीच आमुची प्रार्थना अन् हेच आमचे मागणे' ही प्रार्थना म्हटली. ही प्रार्थना कोणालाही अंतर्मुख करणारी आहे. यातील वाक्य 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे' अतिशय सुंदर आहे. आणि तिसऱ्या कडव्यातील पहिली ओळ 'लाभले आयुष्य जितके ते जगावे चांगले' माझ्या मनाला खूप भावली. आणि ते खरे ही आहे की आपले मरण कधी होणार आहे? आपले आयुष्य किती दिवसांचे आहे? हे कोणालाही माहीत नसते. म्हणून जीवनात कधीच वाईट न वागता चांगले वागून व चांगले विचार आत्मसात करून जीवन जगायचे असते हे नेहमीच लक्षात ठेवले पाहिजे.

आयुष्याचा काय भरवसा
आज आहोत उद्या नाही
मरण कधी? माहीत नसते
काल होतो आज नाही
जीवन प्रवास क्षणभंगुर
मध्येच संपणार की?
शेवट गाठणार अन्यथा
तरुणपणात मृत्यू येणार...

कोणाचे आयुष्य किती? हे ठामपणे कोणीही सांगू शकत नाही. जीवन क्षणभंगुर आहे, जीवन पाण्यावरचा बुडबुडा आहे. तो कधीही फुटू शकतो. आपल्या आयुष्याचा बुडबुडा एकदा फुटला की आपण मरतो. या जगाचा आपण कायमचा निरोप घेतो. नातेवाईक व मित्र मंडळ आपला अंत्यविधी करून कर्तव्यातून मुक्त होतात. आपल्या कर्तृत्वाचा लेखाजोखा मांडतात. आपल्या पश्चात कोणी आपल्याला नावे ठेवतात आणि कोणी आपल्याला चांगले म्हणतात. आपण आपल्या आयुष्यात कधी वाईट वागायचे नसते. आपल्या वर्तनामुळे, आपल्या बोलण्यामुळे आणि आपल्या वाईट कर्मामुळे इतर कोणालाही त्रास होता कामा नये याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. आणि आपण जे जे आर्थिक व्यवहार करतो त्यातून कोणाचे आर्थिक नुकसान होणार नाही हे ही लक्षात घेतले पाहिजे. नाहीतर गरीबांचे पैसे बुडवले की त्यांचा तळतळाट लागतो.

कळेना सर्रास लोकांना
जगायचे जीवन कसे?
रडत रडत की हसत हसत
लोकांना फसवत की
दुसऱ्यांना रडवत...

हे खरे आहे की आजकाल लोक कसेही जीवन जगत आहेत. पैशाच्या लोभापायी व संपत्तीच्या वादातून नात्यांमधला ओलावा आटत चालला आहे. घर व शेतीच्या वाटणीसाठी भावाने केला भावाचा खून, मुलाने वडिलांना जीवे मारले आणि मुलाने जन्मदात्या आईला यमसदनी पाठवले अशा बातम्या रोज वर्तमानपत्रांत वाचायला मिळत आहेत. हृदय हेलावून टाकणाऱ्या अशा बातम्या वाचून मनाला खूप वेदना होतात. आपण माणसे आहोत की राक्षस? असा प्रश्न पडतो. व्यसनांच्या आहारी गेलेले तरुण तरुणी मनमानी जीवन जगत आहेत. वाहने सुसाट वेगाने चालवून इतरांना त्रास देत आहेत. मनावर नियंत्रण न ठेवता व कोणाला न भिता कुठल्या तरी लॉजवर जाऊन व्याभिचार करत आहेत. शिक्षणाच्या नावाखाली आईवडील मुलींना मोबाईल घेऊन देतात.आणि मुलगी मोबाईलचा उपयोग अभ्यासासाठी न करता कोणत्या छपरी व टुकार तरुणांना मोबाईलवर अश्लील व बीभत्स बोलण्यासाठी करते. आई- वडिलांचा केवढा हा मोठा विश्वासघात! आजकाल लोकांची सगळी मरमर जास्तीत जास्त पैसे कमावण्यासाठी चालू आहे. काहीही करून आणि कसेही वाईट वागून जास्तीत जास्त पैसे कमवायचे हाच आजच्या लोकांना ध्यास लागला आहे. बेहिशोबी व गडगंज संपत्ती कमावून त्या संपत्तीचे ते नेमके काय करतात?याचे उत्तर हे की लोभी लोक फक्त संपत्ती संचय करण्यात व्यस्त आहेत. कुठे दान करत नाहीत, नातेवाईकांना मदत करत नाहीत, गोरगरीबांना भेटवस्तू देत नाहीत आणि सामाजिक कार्यासाठी तर एक रुपया सुध्दा देत नाहीत. मग तेवढी गडगंज संपत्ती कशासाठी कमवायची? मेल्यानंतर सगळी संपत्ती सोबत नेता येत नाही हे माहीत असूनही लालची लोकांची संपत्तीची हाव काही सुटत नाही? आणि हो, जर मृत्युनंतर संपत्ती सोबत नेता आली असती तर मग लोक संपत्तीसाठी सतत मारामारी करत राहिले असते आणि अधिकची संपत्ती मिळवण्यासाठी आतापर्यंत अनेक महायुध्द झाली असती.

जगा फक्त माणूस बनून
नीतिमत्ता जागृत ठेवून
गरजूंना मदत करून
दिसेल तुमचे कार्य शोभून

होय, हे खरे आहे की आपण जेवढे काही आयुष्य जगणार आहोत ते चांगलेच आयुष्य जगले पाहिजे. कोणाला त्रास द्यायचा नाही, कोणाची संपत्ती हडपायची नाही, नातेवाईकांना नडायचं नाही, कोणाची फसवणूक करायची नाही, भ्रष्टाचार व अफरातफर करायची नाही. व्यसने व व्याभिचार यांच्यापासून चार हात लांबच राहायचे. तुम्ही जे काम, नोकरी वा उद्योग व्यवसाय करणार आहात ते एकनिष्ठतेने करा. अफरातफर अजिबात करू नका. माणूस या नात्याने जे काही चांगले करता येईल ते करा. चांगली व्यक्ती बनून चांगले जीवन जगा. तुमच्या चांगले पणाचा इतरांना हेवा वाटला पाहिजे, तुमचा आदर्श इतरांनी घेतला पाहिजे.



बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
९५४५४४२६४८.

# विचार स्वातंत्र्याच्या आडून नक्षलवादाच्या पेरणीला जनसुरक्षेचा लगाम

**महाराष्ट्राच्या** विधिमंडळात दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक मंजूर झाले. सरकारकडून जनसुरक्षा विधेयक येण्याच्या चर्चा सुरू होताच विचार स्वातंत्र्याच्या नावाखाली फुटीरतावादी नक्षली विचारांची पेरणी करणाऱ्या काही कडव्या डाव्या विचारांच्या संस्था , संघटनांकडून राज्यभर आंदोलने, निदर्शने करत विधेयकाला विरोध सुरू झाला. परंतु महाराष्ट्र सरकारने विधिमंडळाची संयुक्त कमिटी स्थापन करून सूचना हरकतींचा सकारात्मक विचार करुण महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक मंजूर केले. संविधान विरोधी माओवादी चळवळी व नक्षलवादी प्रवृत्तींना प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्पष्ट केले आहे.
वारकऱ्यांची वारी ही हिंदू समाजाच्या श्रद्धेचा, समर्पणाचा, आत्मशुद्धीचा आणि सामाजिक समरस्तेचा प्रकट उत्सव आहे. संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर अशा थोर विभूतीना ज्या वारकऱ्यांनी आपले गुरू मानले आणी त्यांनी दाखवलेल्याच वाटेवरून वारकरी चालत आहेत. शेकडो वर्षांपासूनच्या परंपरेनुसार सर्व जाती पंथाला सोबत घेऊन हिंदु समाजाला सामाजिक ऐक्याची शिकवण देत सुरू असलेल्या या वारीतील वारकऱ्यांना आताचे स्वयंघोषित पुरोगामी विचारवंत समतेची शिकवण देत आहेत. ज्या वारीचा मूळ गाभाच सामाजिक समरसतेचा आणि ऐक्याचा आहे त्या वारीत विचार स्वातंत्र्याच्या नावाखाली फुटीरतावादी विचारांची पेरणी काही संस्था, संघटना यांच्याकडून जाणीवपूर्वक केली जात आहे. संविधानाने दिलेल्या विचार स्वातंत्र्याच्या अडून फुटीरतावाद आणि सामाजिक ऐक्याला धोका पोहोचवनाऱ्या संस्था , संघटना व त्यांच्या स्वयंघोषित विचारवंतांना लगाम घालण्यासाठी जनसुरक्षा विधेयक गरजेचे आहे. अडीच वर्षांपूर्वी आय.आय.टी-मुंबईत दर्शन सोलंकी आत्महत्येनंतर खळबळ उडाली होती. अनेक डाव्या-विचारांच्या संघटनांनी 'संस्थात्मक हत्ये'चा आरोप करत रान उठवले होते. आंदोलने , निदर्शने आणि शोकसभा झाल्या. त्यात फुटीरतावादी आणि जातीय तेढ निर्माण करणारी प्रक्षोभक भाषणे आणि सामाजिक तेढ निर्माण



करणाऱ्या घोषणाही झाल्या. पण जेव्हा विशेष तपास पथकाने दर्शन सोलांकीचे आत्महत्या पत्र उघड केले व ज्यात अरमान इक्बाल खत्रीने दर्शनचा छळ केल्याचा उल्लेख होता तेव्हा मात्र फुटीरवाद्यांचा सर्व गोंगाट शांत झाला. जातीयवादातून आत्महत्या झाली म्हणून गरळ ओकत दिशाभूल करणारे तथाकथित पुरोगामी विचारवंत सोयीनुसार गप्प बसले. कारण आरोपी विशिष्ट समाजाचा होता. या प्रकरणात ज्यांनी जाणूनबुजून खोटं आख्यान रचलं, जातीय तेढ आणि अराजक पसरवण्याचा प्रयत्न केला, कोणतेही ठोस पुरावे नसताना फक्त आपला राजकीय अजेंडा पुढे रेटला. अभिव्यक्ती स्वतंत्र्याच्या आडून फुटीरतावादी विचार पेरणाऱ्या अशा संघटनांवर कठोर कारवाई साठी जनसुरक्षा विधेयक गरजेचे आहे.''अफजल तेरे कातील जिंदा है, हम शरमिंदा है, भारत तेरे तुकडे होंगे'' अशा घोषणा देणाऱ्यांना लगाम घातलाच पाहिजे आणि म्हणून तुकोबाराय म्हणतात ''नाठाळाच्या माथी हाणू काठी'' त्याप्रमाणे अशा देश आणि समाज विघातक प्रवृत्तींच्या माथी काठी मारण्याचं काम जनसुरक्षा विधेयक करणार आहे. आदिवासी, बहुजन, शेतकरी, गरीब यांना आरोग्य, शिक्षण , घर, वस्त्र या मूलभूत गरजांच्या न्याय हक्कांसाठी संविधानाच्या चौकटीत राहून लढनाऱ्या चळवळीतील कार्यकर्त्यांवर निर्बंध घालण्यासाठी हा कायदाच आलेला नाही. तर विचार स्वातंत्र्याच्या नावाखाली नक्षली विचार पेरनाऱ्या फुटीरवाद्यांवर निर्बंध आणण्यासाठी जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मंजूर झाले आहे. कडव्या डाव्या विचारांच्या संघटनां मानव अधिकार कार्यकर्ते , सामाजिक कार्यकर्ते, कलाकार, पथनाट्यकार, विचारवंत असे विविध प्रकारचे मुखवटे धारण करून समाजातील आदिवासी, दलीत, महिला , अल्पसंख्याक, विद्यार्थी, कामगार यांच्यात जावून फुटीरवादी विचार पेरण्याच काम कडव्या डाव्या विचारांच्या संघटना करतात. एखाद्या समुदायकडून आपल्या मागण्या सरकार दरबारी पोहोचविण्यासाठी व त्या मान्य करून घेण्यासाठी आंदोलने, निदर्शने केली जातात. अशा सरकार विरोधी आंदोलनात घुसखोरी करून संविधानिक मार्गाने शांततेत चाललेल्या आंदोलनाला हिंसक वळण देऊन कायदा व सुव्यवस्था बिघडवत सामाजिक असंतोष निर्माण करण्याचं काम अशा फुटीरतावादी संघटना कडून केलं जात. परिणामी कडव्या डाव्या विचाराच्या संघटनांकडून राष्ट्रीय सुरक्षिततेत सर्वात मोठा अंतर्गत धोका निर्माण होत असून यावर प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक मंजूर झाल आहे एकंदरीत पाहता अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊन राज्यघटनेने स्थापित केलेल्या संविधानिक संस्थांच्या विरुद्ध अराजक माजविण्यासाठी किंवा त्याच अस्तित्व नाकारणाऱ्या , समाजात तेढ निर्माण करणाऱ्या, राष्ट्रीय सुरक्षेला अंतर्गत धोका पोहोचवनाऱ्या फुटीरतावादी संघटनांवर निर्बंध घालण्यासाठी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक हे महाराष्ट्र सरकारने आणले आहे.



विक्रांत उंदरे, वाशी

# परतवारी सोहळा

**पंढरीची** वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकउत्सव होय. आषाढी एकादशी साठी महाराष्ट्रासह इतर राज्यातून व जगातून या वारीचा सुख सोहळा अनुभवण्यासाठी सर्व जाती, पंथ, धर्मचे अनेक भक्त येत असतात. अनेक संतांच्या पालख्या या मार्गावर २० दिवसांपेक्षा अधिक चालतात. या वारीत अनेकांना सुखद अनुभव येत असतो. त्यातून चैतन्य प्राप्त करत आषाढी एकादशी नंतर परत आपल्या गावी फिरतात. परंतु, परतवारीमध्ये कमी लोक असतात व चालण्याचे अंतर मोठे असते. हा प्रवास कष्टमय असलातरी वारकरी मोठ्या आनंदाने चालतात.

जातो माघारी पंढरीनाथा
तुझे दर्शन झालें आता

संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून लाडक्या विठुरायाचे दर्शन झाल्यावर निरोप घेतल्यावर आलेल्या गहिवरला उपमाच नाही. साऱ्या वारकऱ्यांचे चंद्रभागेचे स्नान व विठ्ठल दर्शनाने मन तृप्त झालेले असते. माघारी जावे लागत आहे. घरी गेल्यावर मी तुझाच धावा करील. कामात तुझे चिंतन करीन त्यामुळे माझे कामही सुखरूप पार पडेल. असा भाव मनात घेऊन पुन्हा परतीच्या प्रवासाला वारकरी निघतो. वारीला जाताना अनेक सोहळे उभे, गोल रिंगण तसेच मार्गावर अनेक सुखसुविधा असतात. त्यामुळे एक उत्साहाचे वातावरण असते. पण माघारी फिरताना पाऊले जड वाटू लागतात. तरी सुद्धा विठ्ठल दर्शनाने मिळालेल्या सुखाची शिदोरी आयुष्यभर पुरते. आषाढी एकादशी पार पडली की संत ज्ञानेश्वरांची पालखी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी गोपाळपुरात काला करून विठ्ठलाचे पुन्हा दर्शन करून परतीचा प्रवास सुरु होतो. त्या बरोबर सर्व संतांच्या पालख्या परतवारीला निघतात. सोबत आलेल्या अनेक दिंड्या गाडीत सामान भरून लगेच गावी निघतात. तर काही त्या बरोबर ही चालतात. संतांच्या विचारांच्या संगतीत या वारकऱ्यांना ऊर्जा मिळत असते. ती ऊर्जा कायम ठेवण्यासाठी ते पालखी बरोबर दरोरोज मोठे अंतर चालतात. त्यामुळे कष्टमय असल्याने त्यास वैराग्यवारी सुद्धा म्हणतात. ऐश्वर्यवारी बरोबर वैराग्य वारी करताना अनेकांना जीवनातला सर्वोच्च आनंद मिळतो. म्हणून परतवारी सुद्धा तितकीच महत्वाची आहे.



तुज पाहता सामोरी । दृष्टी न फिरे माघारी ।।
माझे चित्त तुझ्या पाया । मिठी पडली पंढरीराया
नोहे सरिता निराळे । लवण मेळविता जळे ।।
तुका म्हणे बळी । जीव दिला पायांतळी ।।

विठ्ठल दर्शनाने भारावून गेल्यावर नजर माघारी फिरत नाही. सारे लक्ष तुझ्या पायावरच राहते. चरणांशी एकरूपता येऊन मिठी पडली आहे. समुद्रातील पाण्यातून मीठ वेगळे होत नाही तसे तुझ्यापासून वेगळे होऊ शकत नाही. हा जीव विठ्ठलाच्या चरणांशी अर्पण केला आहे. त्यामुळे जीव तुझ्या चरणी समर्पित केला आहे. अशी अवस्था विठ्ठलाच्या दर्शनाने होत असते. त्यामुळे माघारी फिरताना पुन्हा पुन्हा विठ्ठल दर्शनाची ओढ लागलेली असते. बा विठ्ठला तुझी अशीच कृपा आमच्यावरी राहू दे. म्हणत जड अंतकरणाने निघावे लागते, त्यामुळे परतवारी जीवाला कष्टमय वाटत असते. या परतवारीत जाताना मिळालेला आनंद सोबत घेत मनाचे चिंतन करताना आंतरिक बदल स्विकारत प्रवास सुखद होत जातो.



विठ्ठल वळसे पाटील
मो.८४८४०६६०४२.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# अमेरिकेतील कृषी शास्त्रज्ञ डॉ.बालाजी आगलावे यांच्याकडून येरमाळा गावाला औजार बँक भेट

## सामाजिक दातृत्वाबद्दल ग्रामपंचायतकडून डॉ.आगलावे यांचा सत्कार

**आरंभ मराठी | येरमाळा**

येरमाळा येथील अमेरिकेत कृषी शास्त्रज्ञ पदावर कार्यरत असलेले गावचे भूमिपुत्र डॉ. बालाजी आगलावे यांनी शेतकऱ्यांसाठी अमेरिकन अधुनिक औजारांची 'औजार बँक' येरमाळा गावात सुरु केली. आगालावे यांनी कोरोना काळात गावात दहा ऑक्सिजन मशीन दिल्या होत्या. या वेळी त्यांनी अमेरिकन शेती औजारे देऊन 'औजारे बँक' सुरु केल्याने ग्रामपंचायत च्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. येरमाळा येथील डॉ. बालाजी आगलावे अमेरिकेत कृषी शास्त्रज्ञ तथा डायरेक्टर फ्लोरिडा ॲग्रीकल्चर रिसर्च सीईओ म्हणुन कार्यरत आहेत. ते नेहमीच सामाजिक बांधिलकी म्हणून गावासाठी कार्यरत असतात. कोरोना काळात ऑक्सिजनचा तुटवडा असल्याने त्याच्या अमेरिकेतील भारतीयांच्या फाउंडेशन मार्फत त्यांनी देशात अनेक गावात शेकडो ऑक्सिजन मशीन दिल्या होत्या. त्यापैकी येरमाळा गावाला दहा मशीन दिल्या होत्या. त्या आजही गावातील दीर्घआजारी रुग्णांना उपयोगी पडत आहेत. यावेळच्या सुट्टीला येताना त्यांनी गावाकडच्या पारंपरिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी लोकांना बसुन शेतीची कामे करुन पाठ, मान, गुडघे दुखीचा त्रास होतो म्हणुन खुरपनी,कोळपनीसह इतर शेती कामे अमेरिकन शेती पद्धतीने उभारून करता यावी म्हणुन शेती औजारे स्वखर्चातून आणली असून येथील ग्रामपंचायतमध्ये औजार बँकेची सुरुवात करण्यात आली. शनिवारी (ता.१२) ग्रामपंचायत कार्यालयात स्वखर्चातून शेती औजार देऊन औजार बँकेची सुरुवात करण्यात आली. डॉ. बालाजी आगलावे यांचा या निमित्ताने फेटा बांधून,शाल श्रीफळ देऊन माजी सरपंच विकास बारकुल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपसरपंच गणेश बारकुल, मदन बारकुल, सोमनाथ बारकुल, भास्कर कळसाईत, शिवहार मनगिरे, शंकर कांबळे, बंटी बारकुल, आदिनाथ बारकुल, विलास बारकुल यांच्यासह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.



### शेतकऱ्यांचे काम होणार सोप

शेती औजारे बँकेच्या शुभारंभ, सत्कारानंतर डॉ. बालाजी आगलावे यांनी अमेरिकन तंत्रज्ञान पद्धतीने शेतीची कामे करता यावी म्हणून राज्याच्या ४६ गावामधे ही औजार बॅक सुरु आहे. शेती औजारामध्ये खुरपणी,कोळपणी,सरी ओढणे,माती लावणे यासारखी औजारे या बँकेत उपलब्ध असतील. ती औजार बँकेतून घेऊन जाऊन शेतकऱ्यांनी काम झाल्यास जमा करायची अशा पद्धतीने औजार बँकेचे काम असेल. शेतकऱ्यांना याचा फायदा होत असल्याचे डॉ.बालाजी आगलावे यांनी सांगितले.

# नवोदय विद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाबद्दल शिक्षकांचा गौरव



**आरंभ मराठी | तुळजापूर**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात दहावी बोर्ड विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केल्याबद्दल हरी जाधव, वैभव कुलकर्णी, यश पाटील या शिक्षकांचा प्रमाणपत्र, देऊन गौरव करण्यात आला. केंद्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण बोर्ड ,नवी दिल्ली (सीबीएसई) यांच्या मार्फत शैक्षणिक सत्र २०२४-२५ म ध्ये घेण्यात आलेल्या दहावी वर्गाच्या बोर्ड परीक्षेमध्ये नवोदय विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. परीक्षेसाठी ८२ विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये मराठी विषयामध्ये १०० पैकी १०० गुण ४४ विद्यार्थ्यांनी प्राप्त केले. सरासरी एका विद्यार्थ्यास मराठी विषयामध्ये ९९.१६ मिळाले आहेत. पुणे विभागांमध्ये मराठी विषयाचा प्रथम क्रमांक आहे. पुणे विभागात महाराष्ट्र, गुजरात, गोवा, दिव ,दमण या राज्यांचा व केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होत असून मराठी विषयाचे अध्यापन श्री हरी जाधव यांनी केले होते. गणित विषयामध्ये १०० पैकी १०० गुण मिळवणारा १ विद्यार्थी, आर्ट इंटेलिजन्स मध्ये १०० पैकी १०० गुण १ विद्यार्थी असे गुण प्राप्त केले त्याबद्दल शनिवारी (दि.१२) नवोदय विद्यालय समिती, पुणे सहाय्यक आयुक्त आर प्रेमकुमार यांच्या हस्ते शिक्षकांचा गौरव करून शाब्बासकी देण्यात आली. यावेळी नवोदय विद्यालय सोलापूर, येथील प्राचार्य एस सी कोठडी, नवोदय विद्यालय नांदेड, प्राचार्य एस जी मंडले, विद्यालयाचे प्राचार्य के वाय इंगळे ,उपप्राचार्य डी .व्ही. बडे, शिक्षक वृंद, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

# कात्री गावाला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटली ग्रामपंचायतचे दुरुस्तीकडे दुर्लक्ष

**आरंभ मराठी | तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील कात्री गावाला पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन फुटून त्यामध्ये घाण पाणी जाऊन तेच पाणी नागरिकांना प्यावे लागत असून या पाईपलाईनच्या दुरुस्तीकडे मात्र ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तुळजापूर तालुक्यातील कात्री हे जवळपास दोन हजार लोकसंख्येचे गाव असून, या गावात पाणीपुरवठा करण्यासाठी असलेल्या टाकीवरून जी मुख्य पाईपलाईन करण्यात आली आहे ती पाईपलाईन गेल्या एक महिन्यापासून जिल्हा परिषद शाळेजवळ फुटली आहे. त्या फुटलेल्या पाईपलाईन मधून घाण पाणी हे नागरिकांच्या घरात जात असून तेच पाणी नागरिकांना पिण्यासाठी वापरावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने साथीचे रोग मोठ्या प्रमाणावर पसरत आहेत. मात्र कात्री ग्रामपंचायत या गोष्टीकडे दुर्लक्ष करत असल्याने ग्रामस्थांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे ही पाईपलाईन तात्काळ दुरुस्त करून ग्रामस्थांची होणारी गैरसोय दूर करण्याची मागणी गावकऱ्यातून होत आहे.



### सूचना करूनही दुरुस्ती नाही

आमच्या गावातील पाणीपुरवठा करणारी महत्त्वाची पाईपलाईन फ ुटली आहे. मात्र ग्रामपंचायत याकडे दुर्लक्ष करत असून याबाबत वारंवार सूचना करूनही दुरुस्ती करण्यात येत नाही.

**रोहन देशमुख**
रहिवासी, कात्री

### ग्रामपंचायतीचे मुद्दाम दुर्लक्ष

पावसाळ्याचे दिवस सुरू असून गावातील नागरिकांना अशुद्ध पाणी प्यावे लागत आहे. त्यामुळे लहान मुले जेष्ठ नागरिक तसेच अनेक नागरिकांना आजाराला सामोरे जावे लागत आहे. याबाबत ग्रामपंचायत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.

**आकाश पवार**
रहिवासी, कात्री

# रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तीक कुशल कामाच्या बिलांचे वितरण सुरु

## खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचा पाठपुरावा

**आरंभ मराठी | धाराशिव**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (MGNREGA) २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षातील वैयक्तीक कुशल कामांची थकित देयके वितरीत करण्यास शासन स्तरावरून मंजुरी प्राप्त झाली आहे.या थकीत बिलांच्या संदर्भात खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सबंधित विभागाकडे पाठपुरावा केला होता.त्यानुषंगाने सदर योजनेतील विहीरी, गायगोठे, फळबाग लागवड, तुती लागवड, शौचालय आदी वैयक्तीक कुशल कामाच्या बिलापोटी



७ कोटी २० लक्ष व सार्वजनिक कुशल कामाच्या बिलापोटी ८६ लक्ष रुपये निधीचे वितरण सुरु झाले आहे. आयुक्तालय स्तरावरून प्राप्त निर्देशानुसार, ज्या कामांची योग्य पडताळणी व नियमबद्ध प्रक्रियेनंतर खातरजमा झाली आहे, अशा कामांसाठी संबंधित यंत्रणांना देयक अदा करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्याच्या विविध तालुक्यांतील मंजूर देयकांची यादी कार्यालयीन वेळेत निधी आहरणासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थीक वर्षातील थकीत देयके देण्याबाबत संबंधित यंत्रणेला निर्देश देण्यात आले आहेत. तसेच २०२३-२४ या वर्षातील प्रलंबीत देयके देण्याच्या वितरणास मान्यता दिली असल्याचे पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

# तुळजाभवानी संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे संगीत परीक्षेत घवघवीत यश



**आरंभ मराठी | तुळजापूर**

तुळजापूर शहरातील तुळजाभवानी संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संगीत परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या वतीने सन्मानीत करण्यात आले. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मिरज च्या वतीने एप्रिल २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर करण्यात आला आहे. या परीक्षेत तुळजाभवानी संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना संगीत विशारद प्रा. रागिनी पुरूषोत्तम जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे केंद्रीय व्यवस्थापक श्रीराम कुलकर्णी आणि अश्विनी कुलकर्णी यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

### निकालात यशस्वी झालेले विद्यार्थी

**प्रारंभिक - रीतिका महामुनी (प्रथम श्रेणी)**
**क्रितिका महामुनी (प्रथम श्रेणी)**
**अर्णव जेवळीकर (विशेष योग्यता)**
**श्रीराम पाठक**
**प्रवेशिका प्रथम ईश्वरी पाटील (प्रथम श्रेणी)**
**यश केमदारणी (तृतीय श्रेणी)**
**संस्कार यादव (द्वितीय श्रेणी)**
**प्रवेशिका पूर्ण -**
**विरेश कुलकर्णी (प्रथम श्रेणी)**
**माध्यमा पूर्ण -**
**प्रथमेश अमृतराव (प्रथम श्रेणी)**
**समर्थ कसार (द्वितीय श्रेणी)**

# प्रा.अभिमान हंगरगेकर यांचा मराठा वधू-वर सूचक समितीकडून सत्कार



धाराशिव :-- सेवानिवृत्त प्राध्यापक, पत्रकार,रूक्मिणी फाऊंडेशनचे सचिव मराठा सेवक शिवश्री प्रा. अभिमान हंगरगेकर यांचा सामाजिक कार्यगौरव पुरस्कार देऊन धाराशिव सकल मराठा मोफत वधुवर सूचक समितीच्या वतीने वाढदिवसाचे औचित्य साधून शाल,बुके,गणेश मुर्ती देऊन मान्यवरांचे उपस्थितीत यथोचित सत्कार करण्यातआला.प्रा. हंगरगेकर हे प्रमुख मार्गदर्शक असून मोफत वधूवर सूचक समितीत व विवाह चळवळीत योगदान देत आहेत. या सत्कार प्रसंगी संयोजक अशोक गायकवाड,माजी गटशिक्षणाधिकारी राजू तांबे,प्रा नवनाथ पवार,अण्णासाहेब कदम,ॲड रमेश भोसले, कमलाकर मुंडे,गोरोबा लोंढे,माजी मुख्याध्यापक अशोक ठोंबळ,अमोल निंबाळकर,लखन मुंडे, राजाभाऊ जगताप, तसेच तुळजाभवानी जेष्ठ नागरिक संघाचे प्रा.डॉ. तुकाराम बारबोले,प्रा फुलचंद शेळके,माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव जाधव,बापूसाहेब देशमुख,तानाजी सिनगारे,विजयकुमार बागल,दिनकर हुग्गे,दिलीप पवार,सतीश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# मुरुम नगरपरिषदेतर्फे वृक्ष लागवड मोहीम; ९ हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प

**आरंभ मराठी | मुरूम**

मुरुम नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना पर्यावरणाच्या संवर्धनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन नगरपरिषदचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या ''हरित धाराशिव'' अभियानांतर्गत जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली जाणार आहे. याचाच भाग म्हणून मुरुम नगरपरिषदेकडून दिनांक १९ जुलै रोजी जलशुद्धीकरण केंद्र तसेच पालिका हद्दीतील विविध ठिकाणी सुमारे ९ हजार वृक्षांची लागवड केली जाणार आहे. शहरालगत असलेल्या जलशुद्धीकरण केंद्रातील मोकळ्या जागेत नगरपरिषद पुढाकाराने



वृक्ष लागवड करण्यात येणार असून, सध्या जमिनीमध्ये खड्डे घेण्याचे काम वेगाने सुरू आहे. या मोहिमेत औषधी वनस्पती, फळझाडे तसेच विविध प्रकारच्या स्थानिक झाडांची लागवड केली जाणार आहे. मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांनी सांगितले की, दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहनांच्या संख्येमुळे व कारखान्यांम धून होणाऱ्या प्रदूषणामुळे तापमान वाढत आहे तसेच पावसाचे प्रमाण घटत चालले आहे. परिणामी, शेती व्यवसाय संकटात येत आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची ''हरित धाराशिव'' ही संकल्पना अत्यंत स्तुत्य आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि ऱ्हास थांबवण्यासाठी ही वृक्ष लागवड मोहीम उपयुक्त ठरणार आहे. जिल्हाभरात तब्बल ५० लाख वृक्षांची लागवड करण्यात येणार असली तरी लावलेल्या झाडांचे संवर्धन होणे तितकेच महत्त्वाचे असल्याचेही भुजबळ यांनी स्पष्ट केले. मुख्याधिकारी भुजबळ यांनी सर्व नागरिकांना या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन करत, ''हरित मुरुम, हरित धाराशिव'' हा संदेश दिला आहे.

# प्रतापगडाची जागतिक वारसा स्थळांमध्ये नोंद

## सातारा जिल्हा वासियांना युनेस्कोची भेट

**सूर्यकांत पाटणकर | सातारा**

पॅरिस येथे सुरू असलेल्या युनोस्कोचा ४७ व्या जागतिक वारसा समितीच्या अधिवेशनाम ध्ये भारताचा 'मराठा मिलिटरी लँडस्केप ऑफ इंडिया' हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश यामध्ये करण्यात आला आहे.हे सर्व किल्ले आता युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ म्हणून ओळखले जाणार आहेत.दरम्यान,यामध्ये सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या 'प्रतापगडाचा' समावेश केल्याने सातारकरांचा ऊर अभिमानाने भरून आला आहे. शिवछत्रपतींच्या पराक्रमी इतिहासाचे प्रतीक असलेले १२ शिवकालीन किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.या किल्ल्यांमध्ये महाराष्ट्रातील किल्ले रायगड, राजगड,पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसेच तामिळनाडू राज्यामधील जिंजी व सातारा जिल्ह्यातील 'प्रतापगड'या ऐतिहासिक किल्ल्यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रतापगडाचा समावेश जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये करण्यात आल्याने याच गडावर अफजलखानाचा केलेला वध या ऐतिहासिक घटनेचा महत्त्व यामुळे अधोरेखित



झाले आहे.निसर्ग सौंदर्याने नटलेला प्रतापगड किल्ला जवळी खोऱ्यातील इतिहासाचा साक्षीदार आहे.१६५६ मध्ये जावळी खोरे जिंकल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांनी मोरो त्रिंबक पिंगळे यांना हा किल्ला बांधून दिला अतिशय घनदाट जंगलात असलेला हा किल्ला त्याच्या उंच बुर्जांमुळे सुरक्षित मानला जातो.तर ऐतिहासिक महत्त्व अफजल खान व छ.शिवाजी महाराजांच्या भेटीनंतर या किल्ल्याला आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखानाचा वध केला होता यामुळे या किल्ल्याची इतिहासात वेगळी नोंद झाली. पुढे १८१८ मध्ये ब्रिटिश व मराठे यांच्या युद्धानंतर हा किल्ला ब्रिटिशांकडे गेला.अफजलखानाच्या वधानंतर गडाच्या खालच्या बाजूस अफजलखानाची कबर बांधण्यात आली मात्र,ही कबर धार्मिक कारणामुळे शासनाने काढून टाकली. प्रतापगड पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे समुद्रसपाटीपासून एक हजार किलोमीटर उंचीवर असणाऱ्या किल्ल्यावरून दक्षिण उत्तर परिसराचे विलोभनीय दृश्य पर्यटकांना आकर्षित करते.पर्यटनाच्या दृष्टीने विलोभनीय असणारा किल्ला तसेच अफजलखानाचा वध या ऐतिहासिक घटनांमुळे या किल्ल्याचे महत्त्व वाढू लागले.सध्या प्रतापगडावर प्रचंड मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होताना दिसत आहे. यामध्ये शिवभक्तांचा ओढा प्रचंड या ठिकाणी असतो. सातारा जिल्ह्यातील प्रतापगड किल्ल्याचे जागतिक वारसा स्थळ यामध्ये युनेस्कोने समावेश केल्याने या प्रतापगड किल्ल्याचे महत्व आणखी वाढले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या महाराष्ट्रातील तसेच देशातील बारा किल्ल्यांचा समावेश जागतिक पातळीवर झाला आहे ही बाब महाराष्ट्रासाठी नव्हे तर संपूर्ण देशासाठी गौरवाचे बाब आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीने उभारलेली ही दुर्गरचना जगभर ओळखली जाणार,हे महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारे ठरेल.

**छ. श्रीमंत उदयनराजे भोसले,**
खासदार.

### साताऱ्यात जल्लोष...

युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांमध्ये राज्यातील बारा गडकिल्ल्यांचा समावेश केल्याने व त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील 'प्रतापगड' किल्ल्याचा समावेश असल्याने सातारा वासियांच्या वतीने जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, बांधकाम मंत्री छ.श्रीमंत शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पोवई नाक्यावरील छ.शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याला पुष्प अर्पण करून आनंद साजरा केला तसेच जिल्हा पोलीस दलाच्यावतीने मानवंदनादेण्यातआली.

# शिराढोणच्या झेडपी शाळेचे ९ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

## शिक्षकांच्या परिश्रमामुळे शाळेच्या गुणवत्तेचा चढता आलेख

**आरंभ मराठी | शिराढोण**

कळंब तालूक्यातील शिराढोण येथील पीएमश्री आदर्श जिल्हा परिषद प्रशालेची यशाची मालिका सुरुच असून या शाळेने शिक्षणाचा नवा शिराढोण पॅटर्न तालूक्यात निर्माण केला आहे. नवोदय, एनएमएमएस, मंथन, होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा आदी स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळवून ऐतिहासिक निकाल दिल्यानंतर आता या शाळेचे इयत्ता ५ ची व इयत्ता ८ चे मिळून एकूण ९ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी धारक झाले आहे. यामध्ये इयत्ता ५ वी तील सानवी समुद्रे, समृध्दी शिंपले, श्रवण माकोडे, प्राची खडबडे, स्नेहल सोमासे, संध्या सोमासे, समृध्दी कापसे तर इयत्ता ८ वी तील दिशा धाकतोडे व श्रावणी कस्तूरकर हे विद्यार्थी धारक झाले आहेत. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक सुनिल अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक रमेशकुमार काकडे, रमेश व्होके, सुनिता पोतदार, मुक्ता ढकासाळकर, कांतीलाल गणगे, बाळासाहेब काळे, संघशिल रोडे यांनी मार्गदर्शन केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. शाळेच्या गुणवत्तेचा हा चढता आलेख पाहून यावर्षी या शाळेत मोठया संख्येने नविण प्रवेश होत आहेत. शिक्षकांच्या सातत्यपुर्ण परीश्रमामुळे शाळेचा जिल्हाभरात नावलौकीक होत असून शिक्षणाचा नवा शिराढोण पॅटर्न सुरु झाला आहे. या यशाबद्दल गावातील शिक्षणप्रेमी नागरीक, पालक, शालेय व्यवस्थापन समिती यांच्या वतीने विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन होत आहे.



# पवनचक्की उद्योगामुळे वाशी तालुक्यातील अर्थकारणाला गती

## ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढल्या ;पडीक शेतजमिनी वापरात



### हजारो कोटींच्या गुंतवणुकीमुळे अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीला चालना

### पवनचक्कीतला वाशी पॅटर्न:भाग २

विक्रांत उंदरे | आरंभ मराठी

वाशी –पवनचक्कीमुळे राज्यभरात चर्चेला आलेल्या बालाघाटच्या डोंगररांगेतील वाशी तालुक्यात पवनचक्कीमधून ऊर्जा निर्मिती या आधुनिक विकास मॉडेलच्या साईड इफेक्टवर आपण काल पवनचक्कीतला ''वाशी पॅटर्न भाग १'' मध्ये प्रकाश टाकला होता. एका बाजूला पवनचक्कीमधून ऊर्जा निर्मिती उद्योगाचे काही दुष्परिणाम दिसत असले तरी पवनचक्कीमुळे तालुक्यात झालेल्या सकारात्मक बदलांकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. पवनचक्की कंपन्यांच्या गुंतवणूकीमुळे स्थानिकांना रोजगार मिळत आहे. तसेच पडीक शेतजमिनीतून देखील शेतकऱ्यांना पैसे मिळत आहेत. या विषयाची वाईट बाजू पाहताना चांगल्या बाजू देखील समोर यायला हव्या.

पवनचक्कीमधून ऊर्जा निर्मिती कंपन्यांच्या गुंतवणुकीमुळे तालुक्यातील अर्थकारणाला मोठी गती मिळाली आहे. पवनचक्की कंपन्यांमुळे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रोजगार निर्मती, स्थानिक बाजारपेठेतील अर्थकारणा वाढ, घरांची भाडेवाढ , मालमत्तादरात वाढ, वाहनांची खरेदी, जमिनीच्या वापरातून उत्पन्न, ग्रामीण भागाचा औद्योगिक विकास, पडीक शेतजमिनी वापरात येणे यासह तालुक्यातील स्थानिक समुदायांना स्वयंरोजगार निर्मितीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी, स्थानिक लोकांचे जीवनमान सुधारण्यातही पवनचक्की कंपन्यांची मदत झाली असून त्याचे सकारात्मक परिणामही दिसत आहेत.

### स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध

तालुक्यात औद्योगिक वसाहत नसल्याने स्थानिक तरुणांना रोजगारासाठी पुणे, मुंबई , छत्रपती संभाजीनगर याठिकाणी जावे लागत आहे. पवनचक्की कंपन्यामुळे कुशल – अकुशल कामगारांसाठी तालुक्यातच रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून अनेक तरुण या संधीचा फायदा घेत आहेत. तांत्रिक कामांसाठी पवनचक्की कंपन्यांनी बाहेरील कामगार न मागवता स्थानिकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवून तालुक्यातच प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करून तरुणांना अधिकाधिक रोजगार द्यायला पाहिजे. स्थानिक तरूणांनीही या संधीचा फायदा घेत प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे. सेरेंटिका कंपनीने येथील शासकीय आयटीआय सोबत मिळून स्थानिकांना रोजगार देण्यासाठी महिनाभराचे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते.

### पडीक, दुर्गम शेतजमिनींना आला भाव

खडकाळ, डोंगराळ, चीबड्या व दुर्गम भागातील वहीवटीत नसलेल्या शेतजमिनी पवनस्तंभ उभारणीसाठी पवनचक्की कंपन्याकडून भाडेकरारावर घेतल्या जात आहेत. ज्या शेतजमिनी वर्षानुवर्ष पडीक आहेत व शेतमालकाला कधीही उत्पन्न न मिळणाऱ्या वापरात नसलेल्या जमिनी पवनचक्की कंपन्याकडून पवनस्तंभ उभारणीसाठी भाडे करारावर घेतल्या जातात. त्यामुळे पडीक व दुर्गम शेतजमीनीसुद्धा पवनचक्की कंपन्यांमुळे खुल्या बाजारभावातही पूर्वीपेक्षा दुप्पटीने अधिक भाव खात आहेत.

### पवनचक्की कंपन्यांचा थेट शेतकऱ्यांशी संवाद गरजेचा

पवनचक्कीतून ऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपन्या आणि शेतकरी यांच्यात संवादाचा प्रचंड अभाव आहे. शेतकऱ्यांशी समन्वय नसल्यामुळे एकीकडे कंपन्यांना शेतकऱ्यांचे म्हणणे समजून घेता येत नाही. तर दुसरीकडे कंपन्यांची भूमिका शेतकऱ्यांना माहिती होत नाही. परिणामी शेतकरी आणि कंपनी यांच्यात गैरसमज होऊन शुल्लक अडचणी सुद्धा गंभीर बनत आहेत. त्यामुळे अडचणी न वाढवता कंपन्यांनी थेट शेतकऱ्यांशी संवाद साधत प्रशासनाच्या मदतीने मावेजा, रस्ते यासह इतर बाबतीत चर्चेतून मार्ग काढणे गरजेचे आहे.

### वाहनांच्या संखेत लक्षणीय वाढ

तालुक्यात चारचाकी वाहनांसह इतरही मालवाहतुक वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. चारचाकी प्रवासी वाहने, पीकअप, ट्रेलर, जे.सी.बी. , पोकलेन, ट्रॅक्टर, क्रेन, रोडरोलर, पाणी टँकर , हायवा यांसारखी वाहने पवनचक्की कंपन्यांना आवश्यकतेनुसार लागत असतात. अशा वाहनांचा पुरवठा स्थानिकांकडूनच पवनचक्की कंपन्यांना केला जातो. परिणामी, तालुक्यात वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे.

### स्थानिक बाजारपेठेतील अर्थकारणाला गती

पवनचक्की ऊर्जा निर्मिती कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी, बाहेरील मजूर यांच्यामुळे स्थानिक बाजारपेठा गजबजलेल्या असून, पवनचक्की कंपनीच्या लोकांचीच बाजारपेठेत रेलचेल दिसत आहे. तसेच स्थानिक लोकांकडेही पवनचक्कीच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, व्यावसायिक उलाढालीतून पैसे येत आहेत. परिणामी पवन चक्की कंपन्यांच्या माध्यमातून तालुक्यातील आर्थिक उलाढालीत पूर्वीपेक्षा वाढ झाली आहे. त्यामुळे बाजारपेठेतील अर्थकारणाला गती आली असून, तालुक्यातील व्यापाराला चालना मिळाली आहे.

### मालमत्ता दरात वाढ

पवनचक्की कंपन्यांनी पवनस्तंभ उभारणीसाठी शेतकऱ्यांसोबत केलेले भाडेकरार, रस्त्यांचे भाडेकरार, स्थानिक लोकांकडून यंत्रणांचा पुरवठा यासह इतर अनेक माध्यमातून स्थानिकांना आर्थिक लाभ झाला आहे. या पैशांची गुंतवणूक करण्यासाठी लोकांकडून स्थावर मालमत्तेवर अधिक भर आहे. परिणामी तालुक्यातील मालमत्तांच्या दरात वाढ झाली आहे.

### प्रशासनाने बोटचेपे धोरण सोडावे

कंपन्याकडून शेतकऱ्यांना विविध बाबींसाठी मिळणारा मावेजा या शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी प्रशासनाने शेतकरी हित समोर ठेवून कंपन्यांना मावेजाबाबत सर्वसमावेशक धोरण ठरवून देणे गरजेचे आहे. तसेच शेतकऱ्यांच्या समस्या आणि कंपन्यांसोबत असलेले वादविवाद समजून घेणे गरजेचे आहे. शेतकरी व पवनचक्की कंपनी यांच्यात वादविवादाचे प्रसंग निर्माण झाल्यावर अशा ठिकाणी प्रशासनाने बोटचेपे धोरण न अवलंबता सक्षम अधिकारी यांनी कंपनी व शेतकरी यांच्यात मध्यस्ताची भूमिका घेऊन त्यावर सामोपचाराने तोडगा काढणे गरजेचे आहे. शेतकरी किंवा पवनचक्की कंपनी यांनी प्रशासनाकडे केलेल्या तक्रारीचा निपटारा जलदगतीने झाल्यास कंपनी व शेतकरी यांच्यातील वाद अधिक चिघळणार नाहीत.

# अभिनव इंग्लिश स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश; २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव येथील अभिनव इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांनी यंदाच्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केली. शाळेने फक्त शिष्यवृत्ती मिळवूनच यश मिळवले नाही, तर राज्यस्तरावरही आपली गुणवत्ता सिद्ध केली. इयत्ता आठवीतील श्रेयश मुळे याने २७० गुण मिळवून राज्यात १५ वा क्रमांक पटकावला. तर शाळेतील एकूण २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचा अभिनव इंग्लिश स्कूलचे संचालक सतीश मोदानी व प्राचार्य प्रतिभा मोदानी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. इयत्ता आठवी मधील यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये रामढवे सम्मेद (२५८), गुडे गुंजन (२५४), शेंडगे श्रेयस (२५४), इंगळे स्नेहल (२५२), मठपती स्वरूप (२५४), घोडके सागर (२४६), डोंगरे समृद्धी (२२८), गरड श्वेता (२२६), कापसे समर्थ (२२०), चड्डे अक्षरा (२१८) यांचा समावेश आहे. तर इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांमध्ये देशमुख स्पृहा (२५८), मोरे शौर्य (२४८), लाटे राज (२४४), कापसे आदिती (२४२), दुरुगकर अनिस (२४२), पवार शौर्यजीत (२३४), भोसले सृष्टी (२३२), कदम अनघा (२३०), देशमुख राजवीर (२३०), कदम राजेश (२२४), क्षीरसागर सुप्रिया (२२४), बारकुल अर्णव (२२२), गायकवाड धनिष्का (२२२), सोकंडे अपूर्वा (२२०), राजवीर लाकाळ (२२०) यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना महाजन सर, मगर मॅडम, माळी मॅडम, शेरकर मॅडम आणि पडवळ मॅडम यांचे मार्गदर्शन मिळाले.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची अशोक लिलँड कंपनी संचलित सागर मोटर्सच्या विविध आस्थापनेमध्ये निवड

आरंभ मराठी | धाराशिव



तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागाच्या चार विद्यार्थ्यांची लातूर येथील अशोक लिलँड चे प्रसिद्ध डीलर सागर मोटर्स यांच्या विविध विभागासाठी निवड झाली. कंपनीचे प्रतिनिधी रवी जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या होत्या. सागर मोटर्स चे मराठवाड्यात लातूर, धाराशिव, बीड या जिल्ह्यामध्ये कामकाज असून, विद्यार्थ्यांना सागर मोटर्स च्या कामकाजाचा चांगला अनुभव मिळणार आहे. या प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रम सिंह माने म्हणाले की, येणारा काळ हा मेकॅनिकल, सिव्हिल ,कम्युनिकशन या कोर सेक्टर मधील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी चांगला असून, विद्यार्थ्यांची त्यादृष्टीने कॅम्पस प्लेसमेंट ची तयारी आम्ही करून घेत आहोत. विभागाचे नरेंद्र साप्ते , महेश सावंत, प्रतीक साखरे ,ज्ञानेश्वर शेरकर या विदयार्थ्यांची निवड झाली आहे. या ड्राईव्ह चे आयोजन प्रा. अशोक जगताप, प्रा. रणजित दंडनाईक ,प्रा .अनिरुद्ध देशपांडे, रामेश्वर मुंढे यांनी केले होते. तेरणा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, संस्थेचे विश्वस्त आमदार राणाजगजितसिंह पाटील, मल्हार पाटील, मेघ पाटील आणि व्यवस्थापकीय समन्वयक प्रा.गणेश भातलवंडे व सर्व विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# साहित्य भारतीच्या जिल्हाध्यक्षपदी भागवत घेवारे, कार्यवाह रवींद्र शिंदे

## जिल्हा नूतन कार्यकारणी जाहीर

आरंभ मराठी | धाराशिव

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीची नूतन जिल्हा कार्यकारणी देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जाहीर करण्यात आली. त्यात अध्यक्षपदी भागवत घेवारे, कार्यवाह रवींद्र शिंदे, उपाध्यक्ष कविता पुदाले यांची निवड करण्यात आली आहे.कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी संजय कोथळीकर, कोषाध्यक्ष प्रशांत गुरव, संघटन मंत्री भैरवनाथ कानडे, प्रसिद्धीप्रमुख शंकर खामकर व अश्रुबा कोठावळे, मार्गदर्शक राजेंद्र अत्रे, डॉ.अभय शहापूरकर, प्राचार्य प्रशांत चौधरी, महिला प्रतिनिधी सुनीता गुंजाळ कवडे, युवा प्रतिनिधी अविनाश मुंडे, युवती प्रतिनिधी ॲडव्होकेट द्वारका देवळे, वाचक प्रतिनिधी सुरेश शेळके, कार्यकारणी सदस्य प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी, डॉ. बालाजी इंगळे, हनुमंत पडवळ, सहदेव रसाळ, डॉ. अस्मिता बुरगुटे, ॲड. जयश्री तेरकर, अपर्णा चौधरी, मीना महामुनी, सुरेखा जगताप कदम, रेखा सुरेश कदम यांची निवड करण्यात आली आहे.

# भिकार सारोळा येथील लाभार्थ्यांना कीटचे वाटप

## पी.एम. विश्वकर्मा योजनेचा लाभ घ्या: अर्चनाताई पाटील यांचे आवाहन



आरंभ मराठी | धाराशिव

केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेली प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचा लाभ धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष तथा लेडीज क्लबच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी केले. शनिवारी (दि.१२) तेर येथे विश्वकर्मा योजनेतंर्गत भिकार सारोळा येथील लाभार्थ्यांना संबंधित व्यवसायासाठी कीट वाटप करण्यात आले. त्याप्रसंगी अर्चनाताई पाटील बोलत होत्या. यावेळी सरपंच दिदी काळे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती दत्तात्रय देवळकर, माजी सरपंच नवनाथ नाईकवाडी, भास्कर माळी योजनेचे समन्वयक किरण आवटे यांची प्रमुख उपस्थिती होती. आ.राणाजगजितसिंह पाटील व अर्चनाताई पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील महिला व पुरुष यांनी विविध व्यवसायासाठी ७५०० जणांनी ऑनलाईन अर्ज केले होते. त्यापैकी ३५०० लोकांनी प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांना टप्पाटप्प्याने कीट उपलब्ध होणार आहे. याशिवाय व्यवसाय करण्यासाठी एक लाख रुपये कमी व्याज दरात मिळणार आहेत. आतापर्यंत कर्जासाठी १५३१ जणांनी मागणी केली आहे. त्यापैकी ३७२ जणांना कर्ज मंजूर झाले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य प्रतीक नाईकवाडी, व्यंकट माळी, किशोर काळे, अर्शाद मुलानी यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नूतन विद्यामंदिर येथे एक पेड माँ के नाम पर्यावरण अभियानास सुरुवात

आरंभ मराठी | धाराशिव

नूतन प्राथमिक विद्यामंदिर, येथे निसर्ग व मातृप्रेम या दोन्हींची संगती साधणारे ''एक पेड माँ के नाम'' हे अभियान सुरू करण्यात आले. या उपक्रमात प्रत्येक सहभागी व्यक्तीने आपल्या आईच्या सन्मानार्थ एक झाड लावण्याचा संकल्प केला. या अनोख्या अभियानाचे उद्दिष्ट केवळ वृक्षारोपण नव्हे, तर वृक्षांचे पालनपोषण करून त्यांच्यामध्ये आईच्या मायेचा अनुभव घेणे आहे. झाडे जशी आपल्याला सावली, हवा आणि जीवनदायी ऊर्जा देतात, तशीच माया आपल्याला आपल्या आईच्या रूपात मिळते. या भावनेला अनुसरून हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रशालाचे मुख्याध्यापक प्रदीपकुमार गोरे, पालक प्रतिनिधी म्हणून नानासाहेब नलावडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशालेच्या मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात मातृत्वाचे महत्व आणि पर्यावरण रक्षणाचे आजच्या काळातील अपरिहार्यता यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी




उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रकारची झाडे लावली. विशेषतः फळझाडे, औषधी वनस्पती आणि स्थानिक पर्यावरणाला पोषक वृक्ष यावेळी लावले. या अभियानाला शाळेमध्ये मोठा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय जाधव, राम मुंडे, यमुना जाधवर, तृप्ती तिकोने, चित्रा सोनटक्के, दिपाली सुरवसे, गोपाल पौळ, शिवराज खोबरे आदी. सहभागींनी एक पेड माँ के नाम या हॅशटॅगसह आपल्या आईच्या नावाने लावलेल्या झाडांचे फोटो शेअर करून इतरांनाही प्रेरणा दिली.

# भाई उद्धवराव पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव

भाई उद्धवराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे शाळेचे संस्थापक व शेतकरी कामगार पक्षाचे झुंजार सेनानी भाई उद्धवराव (दादा) पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त आणि शाळेच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी (दि.१२) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अमोल घोगरे हे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून शालेय समितीच्या सदस्या श्रीमती पी. के. गाढवे तसेच प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. टी. गंगावणे मॅडम, ज्येष्ठ शिक्षक बी. व्ही. गरड, एच. व्ही. घेवारे सर प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भाई उद्धवराव (दादा) पाटील व भाई बळवंतराव (बप्पा) घोगरे यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी दादांच्या जीवनकार्यावर आधारित विचारमूल्य मनोगते सादर केली. तसेच वर्धापन दिनाचे औचित्य साधून प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा एम.टी.एस., ऑलंपियाड, अक्षरगंगा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा ट्रॉफी, सुवर्णपदक, रौप्यपदक, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला प्राथमिक व माध्यमिक विभागाचे सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय विद्यार्थी पर्यावरण स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





आरंभ मराठी | धाराशिव

पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने राष्ट्रीय विद्यार्थी पर्यावरण स्पर्धा (एनएसपीसी) आयोजित केली आहे. तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्सफूर्त सहभाग नोंदवला. १५० पेक्षा अधिक महाविद्यालयातील युवकांनी 'राष्ट्रीय विद्यार्थी पर्यावरण स्पर्धा (एनएसपीसी)' या ऑनलाइन परीक्षेमध्ये सहभाग घेतला असून, १४२ युवकांनी परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून त्यांच्या पर्यावरण बदल ज्ञानात वाढ केली. या पर्यावरण उपक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालय परिसरामध्ये कंटूर ट्रेंचिंग हा उपक्रम राबविण्यात आला. ट्रेंचिंगची मुख्य उद्दीष्टे म्हणजे पाण्याचा प्रवाह अडथळा आणणे आणि त्यास साठवणे. याचा परिणाम मातीची धूप रोखली जाते, तसेच भूजल पातळी वाढण्यास देखील मदत होते. महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, कुटुंब किंवा समाज अशा भिन्न स्तरांवर वावरत असताना विद्यार्थ्यांमध्ये पाणी, ऊर्जा, स्वच्छता, जैवविविधता संरक्षण याबाबत सवयी विकसित होण्यासह पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती करणे अशा मुख्य उद्देशांसह ग्रीन क्लबची रचना करण्यात आलेली आहे. गतवर्षी च्या मूल्यांकना नुसार तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयामधील ग्रीन क्लब ने जिल्हास्तरावर पाचवा क्रमांक पटकावला असुन तो या वर्षी उत्कृष्ट करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी पाणी व्यवस्थापनाशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर सहभागींशी संवाद साधला. त्यातील निवडक समाजोपयोगी पर्यावरणावरील प्रोजेक्ट *नॅशनल स्टुडंट्स पर्यावरण कॉम्पिटिशन २०२५* मध्ये पाठवणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डी. डी . मुंडे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख, प्रा. अभिजीत कदम यांनी ग्रीन क्लब फॅकल्टी कोर्डिनेटर, प्रा. आर.एस.हिंगमिरे, प्रा. अल्मास शेख, आर.ल. मुंडे, खंडू कलाल, ओम मुंडे यांनी महत्वाची जबाबदारी पार पाडली.

# हवामान बदलामुळे मेंढा येथे ताप व सर्दीच्या रुग्णात मोठी वाढ

आरंभ मराठी | तेर



धाराशिव तालुक्यातील मेंढा येथे हवामान बदलाचा परिणाम झाला असून, गावातील नागरिक सर्दी, ताप, खोकला आदी रोगाने ग्रासले आहेत. असे प्रकार गेल्या आठ दिवसापासून सुरु असल्यामुळे रुग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. खाजगी दवाखाने व सरकारी रुग्णालय रूग्णानी खचाखच भरत आहेत. हवामान बदलामुळे गवतावर बसणाऱ्या डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे ताप, डोके दुखणे, सर्दी खोकला असे प्रकार घडत आहेत. पाण्याच्या बदलामुळे सुद्धा असे प्रकार घडत आहेत. काही भाविक आषाढी एकादशी वारीवरून परत आलेल्या नागरिकांना सर्दी खोकला आहे. त्यामुळे रुग्णसंखेत वाढ होते. यासाठी प्रत्येक नागरिकांनी शिंकताना खोकताना नाकाला रुमाल बांधावा अथवा मास्क घालावा यामुळे रुग्ण संख्येत वाढ होणार नाही असे पाडोळी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले.

### हवामान बदलामुळे आरोग्यावर परिणाम

प्रतिबंधात्मक उपाय म्हणून नागरिकांनी पाणी उकळून प्यावे किंवा आरोग्य विभागाने पाण्यात टाकण्यासाठी दिलेले मेडिकल क्लोराइड दोन थेंब पाण्यात टाकावे मगच पाणी प्यावे. हवामान बदलामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून, नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी.

**डॉ.महेश देवळे**
वैद्यकीय अधिकारी, पाडोळी.